आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२० जुलै २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- येत्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर उद्या केंद्रसरकारनं बोलवली सर्वपक्षीय बैठक

- मुंबईतल्या धारावी पुनर्वसन प्रकल्पाची निविदा रद्द करण्याची उद्धव ठाकरे यांची मागणी / या मागणीला काँग्रेसचाही पाठिंबा

- राज्यात सत्ताधाऱ्यांवर जनतेचा विश्वास राहिलेला नसून महाविकास आघाडीच्या बाजूने कल असल्याचा शरद पवार यांचा दावा

- केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष मनोज सोनी यांचा राजीनामा

**आणि**

- राज्यात ठिकठिकाणी पाऊस, काही ठिकाणी अतिवृष्टीचा फटका तर काही ठिकाणी आगमनाचा आनंद/ **रायगड, साताऱ्याचा घाट परिसर, नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर** जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी.

**<><><><><>**

संसदेच्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारनं उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावं, या दृष्टीनं या बैठकीत चर्चा होईल. संसदेचं हे अधिवेशन १२ ऑगस्टपर्यंत चालेल. केंद्रीय अर्थसंकल्प २३ जुलै रोजी सादर होणार आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या धारावी पुनर्वसन प्रकल्पाची अदानी समूहाला दिलेली निविदा रद्द करून पुन्हा पारदर्शक पद्धतीनं निविदा काढावी, अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते.

धारावीकरांना त्यांच्या हक्काचं ५०० चौरस फुटांचं हक्काचं घर तिथेच मिळायला पाहिजे, ही आपल्या पक्षाची भूमिका असल्याचं ते म्हणाले. अदानी समूहाला वारेमाप एफएसआय दिला जात असून समूहाला दिलेल्या निविदेत वाढीव एफएसआयचा उल्लेख नाही. धारावीकरांना धारावीतून हाकलून लावण्याचा, नागरी संतुलन बिघडवण्याचा हा डाव असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला.

काँग्रेसनंही यासंदर्भात राज्य सरकारवर टीका केली आहे. मुंबईतल्या सर्व जमिनींचे अधिकारच अदानी समूहाला देण्याचा भाजपा सरकारचा डाव असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. राज्य सरकारची भूमिका गुजरातधार्जिणी असून याबाबत राज्यातल्या जनतेमध्ये रोष असल्याचा आरोप पटोले यांनी केला.

मुंबईसह महाराष्ट्र गुजरातला विकण्याचा भाजपाचा डाव काँग्रेस कधीही यशस्वी होऊ देणार नाही, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात जनतेने ज्यांच्या हातात सत्ता दिली त्यांच्याकडून जनतेचे प्रश्न सुटले नाहीत. आता जनतेने महाविकासआघाडीकडून अपेक्षा ठेवल्या असून मविआ राज्याला स्थिर सरकार देईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला. ते पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. पाच वर्षांपूर्वी राज्यात काँग्रेसचा एक आणि राष्ट्रवादीचे चार खासदार निवडून

आले. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राच्या जनतेने ४८ पैकी ३१ खासदार निवडून महाविकास आघाडीला मोठी साथ दिली. याचा अर्थ जनतेचा कल बदललेला आहे, असंही ते म्हणाले. २५ वर्षं मंत्रीपदी राहूनही दिलीप वळसे पाटील यांना मतदारसंघातली कामं करता आली नाहीत, अशी टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाचं महाअधिवेशन उद्या पुण्यात होणार असून यासाठी केंद्रीय मंत्री अमित शाह आणि नितीन गडकरी उपस्थित राहणार आहेत. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत याबाबत माहिती दिली. यावेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे उपस्थित होते. शाह यांच्या भाषणानं अधिवेशनाचा समारोप होईल.

**<><><><><>**

सहकार क्षेत्रासाठी नवीन मंत्रालय स्थापन करून केंद्रातील मोदी सरकारनं गेल्या १० वर्षात घेतलेल्या निर्णयांमुळे कृषी आणि सहकार क्षेत्र अधिक बळकट होत असल्याचं केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात सांगितलं. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेच्या वार्षिक पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. संस्थेमधील कृषीक्षेत्राशी संलग्न अभ्यासक्रमाच्या ३२ व्या तुकडीतील ९९ विद्यार्थ्यांना यावेळी मोहोळ यांच्या हस्ते पदव्युत्तर पदविका प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलं.

**<><><><><>**

`मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून जालना जिल्ह्यातल्या अंतरवाली सराटी या गावात पुन्हा आमरण उपोषण सुरू केलं आहे. उपोषणाला सुरुवात करण्यापूर्वी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सगेसोयरेंची अंमलबजावणी करावी, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावे, तसंच तीनही गॅझेट लागू करावे या मागणीचा त्यांनी पुनरुउच्चार केला. सरकारनं आपल्या मागण्या मान्य न केल्यानं पुन्हा उपोषण करण्याची वेळ आल्याचं जरांगे पाटील म्हणाले. सरकारच्या लाडका भाऊ, लाडकी बहीण या योजनांवरही जरांगे यांनी टीका केली. सध्या शेत कामांचे दिवस असल्यानं कुणीही आंतरवालीकडे येऊ नये, असं आवाहनही जरांगे यांनी केलं आहे. दरम्यान, सरकारनं परीक्षा शुल्क आणि शिक्षण शुल्क माफ करत मुलींना मोफत शिक्षण दिल्याच्या निर्णयाचे जरांगे यांनी स्वागत केलं आहे.

**<><><><>**

UPSC अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष मनोज सोनी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. आपला राजीनामा त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सुपूर्द केला आहे. त्यांचा कार्यकाळ २०२९ मध्ये संपणार होता, पण आपल्या वैयक्तिक कारणांसाठी त्यांनी राजीनामा देत असल्याचं सांगितलं.

**<><><><>**

लातूर शहरातल्या सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या जाहिरातींच्या अनधिकृत फलकांवर महानगर पालिका कारवाई करणार असल्यानं विनापरवानगी उभारलेले फलक आणि पोस्टर्स संबंधितांनी तात्काळ काढावेत, असे आदेश महानगर पालिका अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

**<><><><>**

**राज्यात** आज अनेक जिल्ह्यात पावसानं जोरदार हजेरी लावली. **रायगड, साताऱ्यातील घाट परिसर, नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर** जिल्ह्यासाठी आज हवामान विभागानं रेड अलर्ट जारी केला आहे.

**रायगड** जिल्ह्यात सर्व नद्यांना पूर आले असून रोह्यात कुंडलिका नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे. रोह्याजवळ भिसे खिंडीत दरड कोसळली आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात भातलावण्या अंतिम टप्प्यात आल्या आहेत. दुर्गम भागातली गावं सोडून चिखलणी शेतीच्या अनेक कामांसाठी पॉवर टिलरचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जाऊ लागला आहे.

**विदर्भात** अनेक ठिकाणी रात्रीपासून मुसळधार पाऊस झाला.

**नागपूरमध्ये** पावसामुळे सखल भागात आज सकाळी पाणी साचलं. तिथल्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं. कुही परिसरात काही रस्ते बंद केले गेले.

**नागपूर आणि भंडारा** जिल्ह्यातल्या सर्व शाळा- महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली. भंडारा जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसानं हजेरी लावली असून ढगफुटी सदृश पाऊस बरसत आहे. जिल्ह्यातल्या २३ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली. काही गावांमध्ये प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे. जिल्ह्यातल्या गोसेखुर्द प्रकल्पाचे ३३ पैकी २७ दरवाजे उघडण्यात आले आहेत तर तेलंगणा राज्यातल्या मेडिगड्डा बॅरेजमधून १० हजार ५७६ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. गोसेखुर्द धरणातून ५ हजार क्यूसेक्सपर्यंत पाण्याचा विसर्ग वाढवण्यात येणार असल्यानं नदीकाठावरच्या गावांना सतर्क राहण्याचा इशारा जिल्हा प्रशासनानं दिला आहे.

**चंद्रपूर** जिल्ह्यात सलग दोन दिवसापासून सर्वत्र पावसाची संततधार सुरू आहे. यामुळे जिल्ह्यातले अनेक नदी, नाले दुथडी भरून वाहत आहेत. जिल्ह्यातले अनेक मार्ग वाहतुकीसाठी बंद झाले आहेत. नागभीड तालुक्यातली दोन मुलं पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली. त्यापैकी एका मुलाचा मृतदेह खोल पाण्यात सापडला. दुसऱ्याचा शोध अद्याप चालू आहे.

**अमरावती** जिल्ह्यात संततधार पावसामुळे अचलपूर, चांदूरबाजार इथल्या अनेक गावांमध्ये तसंच बडनेरा शहरात पाणी साचलं. चांदूरबाजार तालुक्यातल्या देऊरवाडा इथं मेघा नदीला पूर आला आहे. मे**ळघाटातले अनेक नदीनाले दुथडी भरून वाहत असल्यानं काही गावांचा संपर्क तुटला आहे.**

**अकोला** जिल्ह्यात पावसानं ओढ दिल्यामुळं पिकं कोमजली होती. मात्र गेले दोन दिवस पाऊस पडल्यानं पिकांना नव संजीवनी मिळाली आहे.

**धुळे** जिल्ह्यातल्या शिंदखेडा तालुक्यात गेल्या चार दिवसांत जोरदार पाऊस झाला आहे. यात दोंडाईचा शहर तसंच शिंदखेडा तालुक्यातल्या चिलाने आणि पंचक्रोशी परिसरातल्या रहिवाशांच्या घरात पाणी शिरलं. यामुळे स्थानिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं. या नुकसानीची खासदार शोभा बच्छाव यांनी काल पाहणी केली.

**गडचिरोली** जिल्ह्यात रात्रीपासून मुसळधार पावसामुळे भामरागडजवळच्या पर्लकोटा नदीला पूर आला. तिथे बॅरिकेट लावून पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. आलापल्ली-भामरागड, भामरागड-एटापल्लीसह सत्तावीस मार्गांवरची वाहतूक ठप्प झाली आहे. गडचिरोली तालुक्यातल्या पोटेगाव जवळच्या कुंभी नाल्याच्या काठावर अडकलेल्या काही शेतकऱ्यांना मदत पथकानं बोटीच्या सहाय्यानं सुखरूप बाहेर काढलं.

**गोंदिया** जिल्ह्यात शेतात काम करत असताना दोन वेगवेगळ्या ठिकाणी पुराच्या पाण्यात अडकलेल्या चार जणांना बचाव पथकानं सुखरूप बाहेर काढलं आहे. **परभणी** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. रिमझिम पावसामुळे गारवा निर्माण झाला आहे. **तसंच सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, तीळ, यांसारखी पिकं  जोमाने वाढलेली दिसून येत आहेत.**

**कोल्हापूर** जिल्ह्यातल्या पंचगंगा नदीची पाणी पातळी इशारा पातळी जवळ म्हणजेच ३६ फुटांवर असून जिल्ह्यात पावसाचा जोर असल्यामुळे पाणी इशारा पातळीकडे सरकत आहे. पुराचं पाणी आलेल्या ठिकाणी नागरिकांनी जाऊ नये, असं इशारा प्रशासनानं दिला आहे

**सांगली**  जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ९पूर्णांक८ दशांश मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात बऱ्याच ठिकाणी अत्यंत जोरदार, पाऊस पडेल, तर तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होईल,असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे. या काळात कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**